# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)

## (ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक २३/२०२१** **दिनांक १९/०३/२०२१** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १३/०३/२०२१ ते १९/०३/२०२१)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक २०/०३/२०२१ सकाळी ८:३० पासून २४/०३/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, कृषि विद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| **१३/०३** | **१४/०३** | **१५/०३** | **१६/०३** | **१७/०३** | **१८/०३** | **१९/०३** | | **२०/०३** | **२१/०३** | **२२/०३** | **२३/०३** | **२४/०३** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | २ | २ | ० |
| ३३.६ | ३६.६ | ३३.४ | ३४.० | ३४.८ | ३५.० | ३३.० | **कमाल तापमान (अं.से)** | ३४ | ३३ | ३५ | ३६ | ३६ |
| १७.४ | १६.२ | १५.७ | १५.५ | १५.८ | १८.० | १६.६ | **किमान तापमान (अं.से)** | २४ | २३ | २३ | २५ | २५ |
| ० | ० | ० | ० | ० | ६ | ६ | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | निरभ्र |
| ८५ | ८५ | ८२ | ८८ | ८१ | ९४ | ९४ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ४८ | ६० | ७२ | ५९ | ६२ |
| ४८ | ४९ | ४९ | ४५ | ४६ | ६१ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | २५ | २४ | २८ | २८ | २६ |
| ३.८ | ४.१ | ३.२ | ३.१ | ४.३ | ३.१ | ३.५ | **वाऱ्याचा वेग(किमी/तास)** | ८ | ५ | ७ | ५ | ६ |
| नै. | प. | प. | वा. | प. | प. | नै. | **वाऱ्याची दिशा** | आ.द. | आ. | द. | पू. | आ.पू. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| **०.०** | **१६.८** | **४१४५.४** |

## हवामान सारांश /इशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रत्नागिरी जिल्हयात दिनांक २१ ते २३ मार्च, २०२१ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून तापमानात १ ते २ अं.सें. इतकी वाढ संभवत असून आकाश अंशत: ढगाळ राहील.** |
| **इशारा** | **दिनांक २१ आणि २२ मार्च, २०२१ रोजी रत्नागिरी जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाचा इशारा देण्यात आला आहे.** |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **सामान्य सल्ला** | - | • दिनांक २१ व २२ मार्च, २०२१ रोजी जिल्हयातील तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाट आणि मेघगर्जनेसह हलक्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने गाई, म्हैशी इ. जनावरे झाडाखाली न बांधता सुरक्षित ठिकाणी पाण्याच्या ठिकाणापासून दूर बांधावेत तसेच तयार आणि पक्व पिकांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **विशेष सल्ला** | - | • दिनांक २१ व २२ मार्च, २०२१ दरम्यान तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाट आणि मेघगर्जनेसह हलक्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने वाढीच्या अवस्थेतील आंबा फळांचे पाऊसापासून तसेच फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी फळांना २५ x २० सें.मी. आकाराच्या कागदी/ वर्तमानपत्रापासून बनविलेल्या पिशव्यांचे आवरण घालावे. |
| **आंबा** | फळधारणा | • दिनांक २१ ते २३ मार्च, २०२१ दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने तसेच तापमान वाढ आणि आर्द्रतेत घट संभवत असल्याने काढणीस तयार असलेल्या आंबा फळांची **चौदा आणे (८० ते ८५ टक्के) तयार फळांची** |

| | | |
|---|---|---|
| | | **काढणी देठासह झेल्याच्या सहाय्याने पाउसाचा अंदाज घेवून सकाळी लवकर किंवा संध्याकाळी ४ नंतर करावी.** उष्णतेमुळे फळांचे तापमान वाढून साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने आंब्याची **फळे काढल्यानंतर लगेचच सावलीमध्ये ठेवावीत** तसेच आंबा फळांची वाहतूक रात्रीच्या वेळेस करावी. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतीही फवारणी करू नये.<br>• **देठकुजव्या आणि फळकूज ह्या काढणी पश्चात बुरशीजन्य रोगापासून** आंबा फळांचे संरक्षण करण्यासाठी **फळे काढणी नंतर लगेच ५२ अं.सें. तापमानाच्या पाण्यात १० मिनिटे बुडवून काढावीत** व नंतर फळे पिकविण्यासाठी ठेवावीत. कोरोगोटेड फायबर बॉक्समध्ये फळे पकिंग करावीत.<br>• दिनांक २१ ते २३ मार्च, २०२१ दरम्यान अंशत: ढगाळ वातावरण राहून तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने वाढीच्या अवस्थेत असलेल्या **आंबा फळांवर करपा रोगाचा** प्रादुर्भाव होण्याची शक्यता असून प्रादुर्भावामुळे फळांवर काळे डाग पडण्याची शक्यता असल्याने **दिनांक २१ ते २३ मार्च, २०२१ दरम्यान ढगाळ वातावरण राहून पाऊस झाल्यास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून** करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डाझीम १२ टक्के + मॅन्कोझेब ६३ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• दिनांक २१ ते २३ मार्च, २०२१ रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने आंबा फळांचे पाऊसापासून तसेच फळमाशीपासून संरक्षण करण्यासाठी **आंबा फळांना २५ x २० सें.मी. आकाराच्या कागदी/ वर्तमानपत्रापासून बनविलेल्या पिशव्यांचे आवरण घालावे.** आवरण घालताना फळाच्या देठाकडे इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>• ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्याने मोठ्या आकाराच्या **आंबा फळांवर फळमाशीचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने बागेमधील गळलेली फळे गोळा करून नष्ट करावीत आणि आंबा फळांचे फळमाशी पासून संरक्षण करण्यासाठी विद्यापीठाने शिफारस केलेले “**रक्षक फळमाशी सापळा**” प्रती एकरी २ या प्रमाणात बागेमध्ये झाडांच्या उंचीप्रमाणे साधारण जमिनीपासून २ ते ३ मीटर उंचीवर राहील अशा प्रकारे टांगावा.<br>• आर्द्रतेत घट संभवत असल्याने वाटाणा ते सुपारी आकाराच्या फळांच्या अवस्थेत असलेल्या आंबा झाडाला ताण बसून फळगळ होण्याची शक्यता असल्याने पाण्याच्या उपलब्धतेनुसार आठवड्यातून एकदा १०० लिटर पाणी प्रति झाड किंवा १५ दिवसातून एकदा १५० ते २०० लिटर पाणी प्रति झाड या प्रमाणात फळे वाटाणा आकारापासून ते सुपारी आकाराची होईपर्यंत द्यावे तसेच झाडाच्या बुंध्याभोवती आळ्यामध्ये गवताचे आच्छादन करावे. मात्र फळे काढणीस तयार होण्याच्या एक महिना अगोदर झाडास पाणी देणे बंद करावे. |
| **काजू** | फळधारणा | • बी अवस्थेत असलेल्या काजूवर ढेकण्या आणि मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडी कोवळ्या बी आणि बोंडातील रस शोषून घेतात  मावा किटक अंगातून मधासारखा गोड पदार्थ बाहेर टाकतात आणि त्यावर मुंग्या आर्कषित होताना दिसून येतात. किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत). |
| **वाल, चवळी** | शेंगा अवस्था | • दिनांक २१ ते २३ मार्च,२०२१ रोजी तुरळक ठिकाणी हलक्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने पक्व शेंगाची काढणी करून शेंगा सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी ठेवाव्यात. |
| **मिरची** | फळधारणा | • दिनांक २१ ते २३ मार्च,२०२१ रोजी तुरळक ठिकाणी हलक्या पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने पक्व मिरचीची काढणी करुन सुरक्षित ठिकाणी ठेवावी. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | फळधारणा अवस्था | • ढगाळ वातावरण संभवत असल्याने वेलवर्गीय पिकामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने फळमाशीच्या नियंत्रणासाठी शेतामध्ये प्रती एकरी दोन ‘क्यु ल्युर’ रक्षक सापळे लावावेत. |
| सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ | | |

समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.